दै. नांदेड वार्ता दि. 09/11/2022

# तीन चोरट्यांना पोलीसांनी केली अटक

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरात एकाच दिवशी पाच दुकानात चोरी करणाऱ्या तीन चोरट्यांना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी अटक केली आहे.

दि.३ नोव्हेंबर रोजी दोन मेडिकल, दोन किराणा तसेच एक इमिटेशन ज्वेलरीचे दुकान अज्ञात चोरट्यांनी फोडून दीड लाखाच्या जवळपास ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली होती. तर दुचाकी चोरुन चोरट्यांनी हा कारनामा केल्याचे समोर आले होते. एकाच रात्री पाच दुकाने फोडल्या गेल्याने व्यापाऱ्यात असुरक्षिततेचे वातावरण पसरल्या गेले. दरम्यान इतवारा व वजिराबाद हद्दीत घरफोडी करणारे गुन्हेगार हे माळटेकडी ते देगलूर नाका जाणाऱ्या रेल्वे ब्रीज जवळ असल्याची गुप्त माहिती एलसीबीला प्राप्त झाल्यानंतर पोलीस पथकाने सापळा रचून तीन गुन्हेगारांना ताब्यात घेतले. आरोपी राजनसिंग ठाकुरसिंग बावरी (१९, हनुमानगल्ली उमरी), मंगलसिंग हिरासिंग बावरी (१९,क्रांतीचौक देगलूर), सोरनसिंग मंगलासिंग जुन्नी (२६, लक्ष्मीनगर,नांदेड) यांची पोलिसांनी चौकशी केली असता त्या तीन आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. गुन्ह्यासाठी वापरलेल्या दोन मोटार सायकली पोलिसांनी जप्त केल्या असून पुढील तपासासाठी आरोपींना इतवारा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. द्वारकादास चिखलीकर, **सपोनि** पांडूरंग माने, पोउपनि **सचिन** सोनवणे, पोउपनि दत्तात्रय काळे यांच्यासह सपोउपनी जसवंतसिंघ शाहू व पोलीस कर्मचारी मारोती तेलंगे, गुंडेराव करले, शंकर म्हैसनवाड, संजय जिंकलवाड, अफजल **पठाण**, देविदास चव्हाण, **मोतीराम** पवार, विलास कदम, **गणेश** धुमाळ, बालाजी **तेलंग**, बजरंग बोडके, महेश **वडगु**, राजवंशी, हनुमानसिंघ ठाकूर, हेमंत बिचकेवार **आदींनी** पार पाडली.

दै. गोदातीर दि. 09/11/2022

# दुचाकी चोरी करणारे अट्टल चोरटे स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

**नांदेड-** जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणाहुन व बाजारातून दुचाकी चोरीस जाण्याच्या घटनांमध्ये गेल्या काही दिवसांत वाढ झाली होती. चोरीस गेलेल्या मोटारसायलकचा शोध घेण्याकरिता पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने दुचाकी चोरांची टोळी जेरबंद केली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे व त्यांच्या सोबतच्या पथकातील सहकारी अंमलदार यांनी नांदेड शहरातील व जिल्ह्यातील चोरीस गेलेल्या दुचाकींचा शोध घेत असताना दि. ८ नोव्हेंबर रोजी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून नांदेड एम. जी. एम. कॉलेज भागातून आरोपी केशव पवन मालपाणी (वय २०) रा. बार्शी जि. सोलापूर ह. मु. गुरुनगर प्रिर्यदर्शनी शाळेजवळ नांदेड, विश्वास परमेश्वर शिंदे (वय २०) रा. एम.जी.एम. कॉलेजसमोर मिळून आल्याने व त्याचे ताब्यातून एकूण चोरीच्या पाच दुचाकी (दोन लाख रुपये) चा मुद्देमाल जप्त केला. त्यांनी-वजिराबाद गु.र.नं. ३५१/२०२२ कलम ३७९ भा. द. वी., २. पो.स्टे. वजिराबाद गु.र.नं. ३९१/२०२२ कलम ३७९ भा. द. वी, ३. पो.स्टे. भाग्यनगर गु.र.नं. २७१/२०२२ कलम ३७९ भा. द. वी, ४. पो.स्टे. विमानतळ गु.र.नं. ३६३ / २०२२ कलम ३७९ भा.द.वी सदरचे जप्त केलेल्या दुचाकीबाबत पो. स्टे. वजिराबाद, पो.स्टे. भाग्यनगर, पो.स्टे. विमनतळ या ठिकाणी गुन्हे दाखल असल्याने सदरचे आरोपीस पो.स्टे. वजिराबाद, पो.स्टे. भाग्यनगर, पो.स्टे. विमानतळ ह्यांचे ताब्यात पुढील कारवाई कामी देण्यात आले आहेत.